महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९
ई-मेल-desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : १७/तंशिसं/NEP-२०२०/२०२४/१११ दिनांक : ४ जून, २०२४

प्रति,

मा. कुलगुरु,

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
२) मुंबई विद्यापीठ, मुंबई
३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
६) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
७) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
८) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
१०) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
११) कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
१२) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई

विषय : **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० या धोरणाची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने दिनांक १६ मे, २०२४ रोजी आयोजित करण्यांत आलेल्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत...**

**संदर्भ** : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. एनईपी-२०२२/(६७/२३)/तांशि-२, दि. ४ जुलै, २०२३ व शुध्दीपत्रक दिनांक ३ ऑगस्ट, २०२३
२) संचालनालयाचे पत्र क्र. १७/तंशिसं/NEP-२०२०/२०२४/९५, दि. १६ एप्रिल, २०२४
३) संचालनालयाचे पत्र क्र. १७/तंशिसं/NEP-२०२०/२०२४/१०५, दि. १४ मे, २०२४

महोदय,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी निवारण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २६ डिसेंबर, २०२२ अन्वये सुकाणू समिती गठित करण्यांत आलेली आहे. तसेच राज्यातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठित केलेल्या सुकाणू समितीच्या शिफारशीनुसार अभ्यासक्रम व श्रेयांक आराखड्याची एकसमान प्रमाणात अंमलबजावणी होण्यासाठी शासन निर्णय दिनांक २० एप्रिल, २०२३ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या स्वायत्त संस्थांमधील (Autonomous Institutes) पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यासक्रम व श्रेयांक आराखड्याची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भाधिन दिनांक ४ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये निर्देश देण्यांत आलेले आहेत. तसेच सर्व अकृषि विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांतील

पदवी अभ्यासक्रमासाठी या धोरणाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून करण्याबाबतही सदरच्या शासन निर्णयात आदेशित करण्यांत आलेले आहे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने संबंधित विद्यापीठांना तसेच स्वायत्त अभियांत्रिकी संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण यांचे कार्यालयीन आदेश क्र. युएनआय/(१३६/२२)/विशि-१/भाग-२/८११७, दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ अन्वये गठित करण्यांत आलेल्या उपकार्यबल गटाची बैठक दिनांक ८ एप्रिल, २०२४ रोजी आयोजित करण्यांत आलेली होती. तसेच सुकाणू समितीच्या दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत प्रत्येक विद्यापीठांच्या प्र. कुलगुरु यांनी अभियांत्रिकी अभ्यासक्रमांबाबत विद्यापीठांनी केलेली कार्यवाही सादर केलेली होती.

उपरोक्त पार्श्वभूमीवर आपल्या अधिपत्याखालील सर्व अभियांत्रिकी संस्थांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही पूर्ण करण्याबाबत संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक १६ एप्रिल, २०२४ च्या पत्रान्वये आपणांस कळविण्यांत आले होते.

त्यास अनुसरुन सद्यस्थिती जाणून घेऊन मार्गदर्शन करण्याकरीता सर्व विद्यापीठांच्या प्र. कुलगुरु व अधिष्ठाता (विज्ञान व तंत्रज्ञान) यांचेसोबत दिनांक १६ मे, २०२४ रोजी सकाळी ११-०० वा. ऑनलाईन बैठक आयोजित करण्यांत आलेली होती. सदरच्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे.

तरी, आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सोबतच्या इतिवृत्तानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

आपला

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत माहितीकरीता सादर :
मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठांच्या प्र.कुलगुरु व अधिष्ठाता (विज्ञान व तंत्रज्ञान) यांचे सोबत दिनांक १६ मे, २०२४ रोजी सकाळी ११-०० वा. आयोजित करण्यांत आलेल्या बैठकीचे इतिवृत्त...**

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठित केलेल्या सुकाणू समितीच्या शिफारशीनुसार अभ्यासक्रम व श्रेयांक आराखड्याची एकसमान प्रमाणात अंमलबजावणी होण्यासाठी शासन निर्णय दिनांक २० एप्रिल, २०२३ अन्वये उच्च शिक्षण संस्थांसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या स्वायत्त संस्थांमधील (Autonomous Institutes) पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यासक्रम व श्रेयांक आराखड्याची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भाधिन दिनांक ४ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये निर्देश देण्यांत आलेले आहेत. तसेच सर्व अकृषि विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमासाठी या धोरणाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून करण्याबाबतही सदरच्या शासन निर्णयात आदेशित करण्यांत आलेले आहे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने संबंधित विद्यापीठांना तसेच स्वायत्त अभियांत्रिकी संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण यांचे कार्यालयीन आदेश क्र. युएनआय/(१३६/२२)/विशि-१/भाग-२/८११७, दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ अन्वये गठित करण्यांत आलेल्या उपकार्यबल गटाची बैठक दिनांक ८ एप्रिल, २०२४ रोजी आयोजित करण्यांत आलेली होती. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ सर्व अकृषि विद्यापिठांच्या अधिपत्याखालील सर्व संलग्नित अभियांत्रिकी संस्थांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठांच्या प्र.कुलगुरु व अधिष्ठाता (विज्ञान व तंत्रज्ञान) यांची बैठक घेऊन आढावा घेऊन मार्गदर्शन करावे असे सदर बैठकीत ठरले होते.

त्यास अनुसरुन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या राज्यातील अंमलबजावणीची सद्यस्थिती जाणून घेण्याकरीता सर्व विद्यापीठांच्या प्र.कुलगुरु व अधिष्ठाता (विज्ञान व तंत्रज्ञान) यांचेसोबत **दिनांक १६ मे, २०२४ रोजी सकाळी ११-०० वा.** ऑनलाईन बैठक आयोजित करण्यांत आलेली होती.

सदर बैठकीस डॉ. आर. डी. कुलकर्णी, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई तथा सदस्य सुकाणू समिती व डॉ. विनोद मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई तथा सदस्य सुकाणू समिती यांचेसह सर्व विद्यापीठांचे प्र. कुलगुरु / अधिष्ठाता (विज्ञान व तंत्रज्ञान) हे उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीस डॉ. विनोद मोहितकर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन शासन निर्णय दिनांक ४ जुलै, २०२३ बाबतची पार्श्वभूमी विषद केली. तसेच शै. वर्ष २०२३-२४ पासून सर्व स्वायत्त संस्थांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी सुरु करण्यांत आल्याबाबत सर्व उपस्थितांना अवगत केले.

तद्नंतर सुकाणू समितीच्या दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत प्रत्येक विद्यापीठांच्या प्र.कुलगुरुंनी अभियांत्रिकी अभ्यासक्रमांबाबत विद्यापीठांनी केलेली कार्यवाही सादर केल्याचे सांगितले. तसेच दिनांक २ व ३ मे, २०२४ रोजी पुणे येथे झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सर्व अकृषि विद्यापिठांच्या अधिपत्याखालील सर्व संलग्नित अभियांत्रिकी संस्थांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठांच्या प्र.कुलगुरु व अधिष्ठाता (विज्ञान व तंत्रज्ञान) यांची बैठक आयोजित करुन आढावा घेऊन मार्गदर्शन करावे असे ठरल्याचेही नमूद केले.

तद्नंतर डॉ. आर. डी. कुलकर्णी, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांनी उच्च शिक्षण विभागाचा दिनांक २० एप्रिल २०२३ रोजीचा शासन निर्णय व तंत्र शिक्षण विभागाचा दिनांक ४ जुलै, २०२३ रोजीचा शासन निर्णय यामधील फरक सांगून दिनांक ४ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार खालील मुद्यांच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

१. **अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या** Basic Degree **मध्येच** (१६०-१७६ Credits) Multidisciplinary Minor (MDM) **चा समावेश आहे** :
   अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या Basic Degree चे Nominclature e.g. B.Tech. in Mechanical Engineering with Minor in Computer Engineering असे असावे.

२. **"Minor" आणि "Minor in Emerging Areas" मधील फरक :**
   वरील Basic Degree व्यतिरिक्त विद्यार्थी Emerging Areas मधील Minor विषय (e.g. IoT, Blockchain, Robotics, AI/ML, etc.) घेऊ शकतील व त्यांना त्या विषयाचे १८-२० अतिरिक्त श्रेयांक (Additional Credits) प्राप्त करावे लागतील. (e.g. B.Tech. in Computer Science with Minor in Mechanical and Minor in AI etc.) असे असावे.

३. **विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष/व्दितीय वर्ष/तृतीय वर्षानंतर Exit घेताना करावयाचे अतिरिक्त श्रेयांक (Additional Credits) :**
   विद्यार्थ्यांना दिनांक ४ जुलै, २०२३ मधील मुद्दा क्र. ७ (b) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिकचे ८ श्रेयांक (Credits) प्राप्त करणे अनिवार्य राहील.

४. **थेट व्दितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना करावयाचे अतिरिक्त श्रेयांक (Additional Credits):**
   सध्या अभियांत्रिकी पदविका (Diploma) करुन कोणत्याही अभियांत्रिकी शाखे मध्ये (Branch) थेट व्दितीय वर्षात प्रवेश दिल्या जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांना संबंधित अभियांत्रिकी शाखेतील (Branch च्या) विषयाचे २ अतिरिक्त श्रेयांक (Additional Credits) प्राप्त करणे अनिवार्य राहील.

५. **विद्यार्थ्यांना करावयाची Internship :**
   विद्यार्थ्यांना औद्योगिक संस्थांमध्ये एक संपूर्ण सत्र (७ वे किंवा ८ वे Semester) करावयाची Internship

६. **Open Electives मधील विषयांची व्याप्ती :**
   विद्यार्थी Open Electives मध्ये Maths / Science या विषयांव्यातिरिक्त सुध्दा इतर कोणत्याही विषयाची निवड करु शकतात. (e.g. Accounts, History, etc.) विद्यापीठांनी या विषयांतर्गत Basket तयार करावीत.

७. **व्दिभाषिक प्रश्नपत्रिका तयार करणे :**
   अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिका इंग्लिश तसेच मराठी भाषेत तयार करणे व विद्यार्थ्यांना सदर प्रश्नपत्रिका इंग्लिश तसेच मराठी भाषेत सोडविण्याची सुविधा

तद्नंतर उपस्थित अकृषी विद्यापीठांकडून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करण्याबाबत विद्यापीठांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यांत आला. याबाबत, सर्व विद्यापीठांच्या प्रतिनिधींनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने त्यांचे अधिपत्याखालील संलग्नित अभियांत्रिकी संस्थांमध्ये सर्व उपाययोजना केल्याबाबत सांगितले. तद्नंतर खालील मुद्यांच्या अनुषंगाने उपस्थितांच्या शंकांचे निरसन करण्यांत आले.

१. **Minor मध्ये कोणकोणते Courses असावेत :**
   विद्यार्थी ज्या शाखेत शिक्षण घेत आहे, त्या व्यतिरिक्त इतर शाखेचा विषय तो Minor म्हणून निवडू शकतो. यासाठी त्याला शासन निर्णय दिनांक ४ जुलै, २०२३ मधील मुद्दा क्र. ३ (b)

मध्ये नमूद Credit Frame Work प्रमाणे सदर विषयाचे १४ श्रेयांक (Credits) प्राप्त करावे लागतील. सदरचे श्रेयांक हे एकूण (१६०-१७६) श्रेयांकांमध्ये अंतर्भूत आहेत.

२. **वेगवेगळ्या स्तंभांमधील (Vertical) विषयांच्या श्रेयांक (Crdits) ची लवचिकता (Flexibility) :**

विद्यापीठ संबंधित प्राधिकरणाची मान्यता घेऊन शासन निर्णय दिनांक ४ जुलै, २०२३ मध्ये नमूद Credit Frame Work स्तंभांतील (Vertical) मधील विषय इतर Semester मध्ये बदलू शकतात. तथापि, प्रत्येक Semester चे २०-२२ एकूण श्रेयांक (Total Credits) असावेत व प्रत्येक वर्षाचे एकूण श्रेयांक (Total Credits) ४०-४४ असावेत.

३. **पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी कार्यवाही करणे :**

पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करताना शासन निर्णय दिनांक ४ जुलै, २०२३ मधील तरतूदींच्या आधारे विद्यापीठ स्तरावर कार्यवाही करण्यांत यावी.

४. **Honors with Research पदवीबाबत आवश्यक Credits :**

शासन निर्णय दिनांक ४ जुलै, २०२३ मधील मुद्दा क्र. २ (c) आणि २ (d) मध्ये नमूद केल्याप्रमाणे Honors with Research पदवीसाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या Major विषयातील Specialized असा १८-२० श्रेयांक (Crdits) चा संशोधन प्रकल्प (Research Project) करावा लागेल. या प्रकल्पाचे (Projects) चे १८ श्रेयांक (Credits) हे त्याच्या Basic पदवीच्या Requirements च्या श्रेयांकाव्यतिरिक्त (१६०-१७६ Credits) अतिरिक्त श्रेयांक (Additional Credits) असतील.

५. **Emerging Areas मधील Minor Courses साठी आवश्यक Credits :**

Basic Degree व्यतिरिक्त विद्यार्थी Emerging Areas मधील Minor विषय (e.g. IoT, Blockchain, Robotics, AI/ML, etc.) घेऊ शकतील व त्यांना त्या विषयाचे १८-२० अतिरिक्त श्रेयांक (Additional Credits) प्राप्त करावे लागतील. (e.g. Degree Nomenclature 'B.Tech. in Computer Science with Minor in Mechanical and Minor in AI' असे असेल).

६. **SWAYAM Plus या Portal विषयी माहिती :**

SWAYAM Plus या Portal वर अभियांत्रिकी (Engineering) व्यतिरिक्त इतर अभ्यासक्रमांचे (Faculty) विषय उपलब्ध आहेत. विद्यार्थी हे विषय Online पध्दतीने शिकू शकतात आणि स्वायत्त संस्था (Autonomous Instt.)/ विद्यापीठे या विषयांची परीक्षा (Exam) त्यांचे स्तरावर घेऊ शकतात. यासाठी विद्यार्थ्यांना SWAYAM Portal वर उपलब्ध परीक्षा (Exam.) देण्याची आवश्यकता नाही.

यानंतर सर्व विद्यापीठांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सर्व अध्यापकांना प्रशिक्षण देणे तसेच प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाविषयी सविस्तर माहिती देण्याबाबत सूचित करण्यांत आले. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सदरचे धोरण यशस्वीपणे राबवावे असे आवाहन सर्वांना करण्यांत आले. तसेच याबाबत अधिक माहिती अथवा मार्गदर्शन हवे असल्यास संपर्क साधण्याबाबतही सूचित करण्यांत आले.

बैठकीच्या शेवटी डॉ. विनोद मोहितकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्र शिक्षण

(डॉ. आर. डी. कुलकर्णी)
कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई